# बोर्ड प्रश्नपत्रिका : ऑक्टोबर २०१४

**वेळ: २ तास** **एकूण गुण : ४०**

**सूचना:**

i. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

ii. उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवतात.

iii. **१ ते ५** प्रश्न इतिहास व **६ ते ९** प्रश्न राज्यशास्त्र या विषयावरील आहेत.

**प्र.१. अ. कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा:** [३]

१. धारासना सत्याग्रहाचे नेतृत्व __________ यांनी केले.
(सरोजिनी नायडू, कस्तुरबा गांधी, मादाम कामा)

२. अठराव्या शतकापर्यंत __________ खंड अज्ञात खंड म्हणून ओळखला जात होता.
(आशिया, आफ्रिका, अमेरिका)

३. अणुशक्तीचे जनक __________ यांना म्हटले जाते.
(नील्स बोर, वॉल्टन, प्रा. रुदरफोर्ड)

**ब. 'अ' स्तंभातील घटकांशी 'ब'स्तंभातील घटकांबरोबर योग्य जोड्या लावा:** [३]

| | 'अ' स्तंभ | | 'ब' स्तंभ |
|---|---|---|---|
| १. | राष्ट्रसंघाचे सचिवालय | अ. | अलिप्ततावादी चळवळ |
| २. | लॉर्ड कर्झन | ब. | जिनिव्हा |
| ३. | पंडित नेहरू | क. | बंगालची फाळणी |
| | | ड. | अमेरिकेचे अध्यक्ष |

**प्र.२. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी २५ ते ३० शब्दांत लिहा (कोणतेही दोन):** [४]

१. साम्राज्यवादी राष्ट्रांनी चीनवर कशा प्रकारे आर्थिक वर्चस्व निर्माण केले?

२. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी क्रांतिकारकांनी कोणता कार्यक्रम आखला?

३. कृत्रिम उपग्रहाचे फायदे कोणते ते लिहा.

**प्र.३. खालील विधानांची कारणे प्रत्येकी २५ ते ३० शब्दांत लिहा (कोणतेही दोन):** [४]

१. पोर्तुगिजांना भारतात साम्राज्य निर्माण करता आले नाही.

२. भारतातील खेड्यांची स्वयंपूर्णता नष्ट झाली.

३. युरोपात लष्करवाद वाढीस लागला.

**प्र.४. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ४० ते ५० शब्दांत लिहा (कोणतेही दोन):** [६]

१. साम्राज्यवादाची कोणतीही तीन कारणे लिहा.

२. राष्ट्रसंघाची उद्दिष्टे स्पष्ट करा.

३. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सरचिटणिसाची कामे लिहा.

**प्र.५. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ६० ते ८० शब्दांत लिहा. (कोणतेही दोन):** [८]

१. पहिल्या महायुद्धाचे परिणाम लिहा.

२. संगणकाचे विविध क्षेत्रांतील उपयोग लिहा.

३. रशियन राज्यक्रांतीची माहिती खालील मुद्द्यांनुसार लिहा:

अ. रशियातील जुलमी राजवट  ब. लेनिनचे योगदान

**प्र.६. कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** [३]

१. भारतात __________ प्रकारची लोकशाही आहे.

(प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष, अध्यक्षीय, मिश्र)

२. विषमतेचे भारतातील सर्वांत ठळक उदाहरण म्हणजे __________ होय.

(धर्मव्यवस्था, राज्यव्यवस्था, जातीव्यवस्था, समाजव्यवस्था)

३. निवडणुकीत बहुमत प्राप्त झालेल्या पक्षाला __________ म्हणून ओळखले जाते.

(सत्ताधारी, विरोधी, अपक्ष, स्वतंत्र)

**प्र.७. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे द्या (कोणतेही तीन):** [३]

१. समाजात कोणत्या आधारावर श्रेष्ठ व कनिष्ठ विभागणी दिसून येते?

२. प्रातिनिधिक लोकशाही अपरिहार्य का आहे?

३. भारतातील राजकीय पक्षांचे प्रमुख प्रकार किती व कोणते?

४. सामाजिक दडपणाचे कोणतेही एक उदाहरण लिहा.

५. भारतात जातीप्रथा नाहीशी करण्यासाठी कोणी प्रयत्न केले?

**प्र.८. खालील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा (कोणतेही दोन):** [४]

१. नागरिकांच्या प्रत्यक्ष सहभागावर आधारित असणारी लोकशाही म्हणजे अप्रत्यक्ष लोकशाही होय.

२. लोकशाहीत विरोधी पक्ष असणे महत्त्वाचे मानले जाते.

३. आर्थिक विषमता हे लोकशाहीपुढील आव्हान नसते.

**प्र.९. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर २५ ते ३० शब्दांत लिहा:** [२]

१. स्त्री-पुरुष विषमतेचे प्रश्न सोडविण्यासाठी कोणकोणत्या मार्गांचा अवलंब केला जातो?

२. विषमतेची आव्हाने कोणती ते सांगून एका आव्हानाचे स्पष्टीकरण करा.